मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482

लाचखोरीवरून महापालिकेत रणकंदन!

सर्वपक्षीय नगरसेवक आक्रमक; दोषी अधिकाऱ्यांच्या बडतर्फीची मागणी!

» पिंपरी | प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांच्या लाचखोरी प्रकरणावरून सर्वपक्षीय नगरसेवकांनी प्रशासनाला धारेवर धरले. संबंधित अधिकाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई करण्याची मागणी करत नगरसेवकांनी प्रशासनाच्या कारभाराचा तीव्र निषेध केला. या गंभीर विषयावर चर्चा सुरू असताना आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी सभागृहात आले आणि अवघ्या दहा मिनिटांत निघून गेल्याने नगरसेवकांचा संताप अनावर झाला. अखेर सभागृह नेते प्रशांत शितोळे यांनी सभा तहकूब करण्याची मागणी केली. त्यानंतर सभा २० नोव्हेंबरपर्यंत तहकूब करण्यात आली.

महापालिकेची तहकूब सर्वसाधारण सभा उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. महापौर रवि लांडगे गैरहजर असल्याने उपमहापौरांनी सभेचे कामकाज पाहिले. सुरुवातीला आयुक्तांच्या अनुपस्थितीत अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम सभेला उपस्थित होते.

सभेच्या कामकाजादरम्यान मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांच्या लाचखोरीचा मुद्दा नगरसेवक विश्वजीत बारणे आणि भाऊसाहेब भोईर यांनी उपस्थित केला. या प्रकरणावरून प्रशासनाला जाब विचारला जात असतानाच आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी सभागृहात दाखल झाले. मात्र, काही वेळातच ते बाहेर पडल्याने नगरसेवकांनी नाराजी व्यक्त केली.

नगरसेवक जितेंद्र ननावरे यांनी अधिकारी लाचखोरीत मग्न असून नगरसेवकांचे फोनही उचलत नसल्याचा आरोप केला. अधिकाऱ्यांनी बेहिशेबी मालमत्ता जमवली असून प्रशासनाचा कारभार योग्य पद्धतीने सुरू नसल्याची टीका त्यांनी केली. नगरसेवकांचा सन्मान राखला जात नसेल तर लोकप्रतिनिधींनी कामकाज कसे करायचे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

नगरसेवक अनंत कोऱ्हाळे यांनी गुन्हा दाखल झाल्यानंतरही संबंधित अधिकारी पुन्हा कामावर येत असल्याबद्दल संताप व्यक्त केला. अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी नगरसेवकांना वेळ मिळत नसल्याची तक्रार करत लाचखोरीच्या प्रकरणातील संबंधित अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्याचा ठराव करण्याची मागणी त्यांनी केली.

नगरसेविका शीतल शिंदे यांनी लाचखोरीची घटना शहराला काळिमा फासणारी असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांकडून पत्रव्यवहाराला उत्तरे दिली जात नसल्याचा आरोप करत त्यांनी अनधिकृत बांधकामांचा मुद्दाही उपस्थित केला. मोरया डेव्हलपर्स, भक्ती बिल्डर, डॅफोडिल्स प्रकल्पातील आठव्या मजल्याचे कथित अनधिकृत बांधकाम आणि रुणाल डेव्हलपर्स यांच्याशी संबंधित प्रकल्पांबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित केले. तसेच अग्निशमन यंत्रणेच्या उपलब्धतेवरही चिंता व्यक्त केली.

बांधकामांच्या मंजूर आराखड्यात आणि प्रत्यक्ष बांधकामात तफावत असल्यास फ्लॅट खरेदीदारांची फसवणूक होण्याची शक्यता आहे. भविष्यात पुनर्विकास करताना नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे प्रशासनाने नागरिकांना विश्वासात घेऊन योग्य कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. नगरसेवक कुणाल वाव्हळकर यांनीही संबंधित अधिकाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई करण्याची मागणी केली.

सभागृह नेते प्रशांत शितोळे यांनी आयुक्तांच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. शहराचे नाव बदनाम करणाऱ्या लाचखोरीच्या गंभीर विषयावर चर्चा सुरू असताना आयुक्त सभागृहात आले आणि अवघ्या दहा मिनिटांत निघून गेले.

प्रशासनाचे स्पष्टीकरण

दरम्यान, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी हे सभेला उपस्थित होते. मात्र, पंतप्रधान प्रगती योजनेअंतर्गत व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे आयोजित तातडीच्या बैठकीसाठी त्यांना उपस्थित राहावे लागले. त्यामुळे त्यांनी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांना सभेला उपस्थित राहण्याच्या सूचना दिल्या होत्या. ऑनलाइन बैठक पूर्ण झाल्यानंतर ते पुन्हा महापालिका सभेला उपस्थित राहण्यासाठी निघाले असता सभा तहकूब झाल्याचे त्यांना समजले, असे स्पष्टीकरण महापालिका प्रशासनाकडून देण्यात आले.

मोशी कचरा डेपोच्या मनमानी विस्तारीकरणाविरोधात नागरिकांचा एल्गार

» पिंपरी | प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रभाग क्रमांक ३ मधील मोशी कचरा डेपोच्या मनमानी विस्तारीकरणाविरोधात स्थानिक रहिवाशांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. शहरातील तब्बल ८ ते १० वेगवेगळ्या भागांतील कचरा मोशी येथे आणून टाकण्याचा घाट महापालिका प्रशासनाकडून घातला जात असल्याचा गंभीर आरोप नागरिकांनी केला आहे. या प्रस्तावित कचरा विलगीकरण आणि विस्तारीकरणामुळे मोशीसह चिखली, चऱ्होली आणि इंद्रायणीनगर परिसरातील हवा, पाणी आणि नागरिकांचे आरोग्य मोठ्या प्रमाणावर धोक्यात येण्याची भीती निर्माण झाली आहे.

प्रशासनाच्या या मनमानी कारभाराला विरोध करण्यासाठी येत्या गुरुवारी, ५ नोव्हेंबरला सकाळी ९ वाजता मोशी येथे जाहीर जनआंदोलनाचे आयोजन करण्यात आले . माजी महापौर राहुलदादा जाधव, माजी महापौर नितीन आप्पा काळजे, नगरसेविका नम्रता ताई लोंढे, नगरसेवक निखिल बोऱ्हाडे, नगरसेविका अर्चना सस्ते, नगरसेविका सारिका बोऱ्हाडे, नगरसेवक सागर गवळी, नगरसेवक सचिन तापकीर, नगरसेवक डॉ सुहास कांबळे, नगरसेविका सुजाता बोराटे उपस्थित असणार आहेत.

स्थानिक रहिवासी आणि लोकप्रतिनिधींनी या निर्णयाविरोधात आधीच आक्रमक भूमिका घेतली असून, महापालिका आयुक्तांना लेखी निवेदन देऊन प्रशासनाच्या या धोरणाचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवला आहे. वाढत्या कचरा प्रकल्पामुळे निर्माण होणारी दुर्गंधी, भूगर्भातील पाण्याचे प्रदूषण आणि हवेतील विषारी घटकांमुळे नागरिकांच्या मूलभूत आरोग्याशी थेट खेळ चालवला जात असल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे. प्रशासनाला या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन योग्य तो निर्णय घेण्यासाठी आगामी १५ दिवसांची मुदत देण्यात आली आहे. प्रशासनाने या कालावधीत प्रकल्प मागे न घेतल्यास हे आंदोलन अधिक तीव्र करून कायमस्वरूपी लढा उभारण्याचा थेट इशारा स्थानिक कृती समितीने दिला आहे.

या अन्यायाविरोधात महापालिका प्रशासनाला जागे करण्यासाठी मोशी, चिखली, चऱ्होली आणि इंद्रायणीनगर परिसरातील समस्त नागरिकांनी, महिलांनी आणि तरुणांनी मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. या आंदोलनामुळे आता महापालिका प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

खर्चकपातीसाठी अभिषेक बारणेंचे कडक निर्देश!

खर्चकपातीसाठी १० दिवसांचा अल्टिमेटम; कामात दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांना इशारा!

पिंपरी | प्रतिनिधी

महानगरपालिकेचा कारभार अधिक गतिमान, शिस्तबद्ध आणि पारदर्शक ठेवण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी गांभीर्याने काम करावे, असे निर्देश स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी स्थायी समिती बैठकीत दिले. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीची बैठक आज पार पडली. यामध्ये विविध विकास कामांना मंजुरी देण्यात आली. तसेच, महापालिकेच्या विविध विभागांच्या कामकाजाचा व आर्थिक नियोजनाचा सभापती बारणे यांनी सविस्तर आढावा घेतला. महापालिकेची तिजोरी सावरण्यासाठी आणि खर्चात कपात करण्यासाठी सर्व विभागांचे सहकार्य अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

या बैठकीत उपस्थितीबाबत कडक निर्देश देण्यात आले असून, सर्व संबंधित अधिकारी, विभागप्रमुख, कार्यकारी अधिकारी आणि ह्युमन रिसोर्सेस (HR) यांच्या उपस्थितीची नोंद घेतली जाणार आहे. जे अधिकारी अनुपस्थित असतील, त्यांना अनुपस्थित राहण्याचे कारण स्पष्ट करावे लागेल किंवा त्यांच्या वतीने दुसऱ्या कोणाला बैठकींना पाठवावे. महानगरपालिकेचे आर्थिक धोरण सुधारण्यासाठी प्रत्येक विभागाने आपला खर्च कसा वाचवता येईल, याबाबतचा सविस्तर अहवाल १० दिवसांच्या आत सादर करणे बंधनकारक राहील, अशा सूचना देखील त्यांनी केल्या.

महापालिकेच्या मालमत्तेचा योग्य वापर करण्यावर भर द्यावा. वापराविना मोकळ्या पडलेल्या मालमत्तामधून मनपाला कसे उत्पन्न मिळेल, याचे नियोजन करावे. महानगरपालिकेच्या मालकीच्या सर्व मालमत्तांचे योग्य मॉनिटरिंग करणे ही केवळ एका विशिष्ट विभागाची किंवा व्यक्तीची जबाबदारी नसून, महापालिकेच्या प्रत्येक कर्मचाऱ्याची ती सामायिक जबाबदारी असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले.

जर एखादा विभाग सोडून इतर काही निदर्शनास आले, तर संबंधित विभागाला सांगून ती जबाबदारी पूर्ण करणे आवश्यक आहे. सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची बायोमॅट्रिक हजेरी १००% असणे अनिवार्य असून, यामध्ये कसूर करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. मात्र, काही ठिकाणी आरोग्य विभागातील कर्मचारी पाणी पुरवठ्याचे काम करतात आणि त्यांची बायोमॅट्रिक हजेरी होत नाही, याबाबत शहानिशा करून योग्य ती सुधारणा करण्याचे निर्देश देण्यात आले.

बजेट बुकमध्ये समाविष्ट असलेली सर्व कामे आगामी काळात निश्चित वेळेत पूर्ण झाली पाहिजे. ज्या विभागांची कामे अपूर्ण आहेत किंवा ज्या कामांचे बजेट मंजूर झाले आहे, त्या कामांचा सविस्तर अहवाल १० दिवसांच्या आत सादर करण्याचे आदेश सभापती बारणे यांनी बैठकीत दिले. तसेच, अधिकाऱ्यांच्या टेबलवर फाईल्स विनाकारण प्रलंबित ठेवू नयेत; फाईल किती दिवस प्रलंबित आहे आणि जास्त काळ थांबल्यास त्याची कारणे वरिष्ठांना पत्रद्वारे कळवणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

फाईल मंजुरीची प्रक्रिया जलदगतीने पार पाडण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. याशिवाय, महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये कर्मचाऱ्यांची संख्या, त्यांची कर्तव्ये आणि कामाची स्थिती याचा आढावा घेऊन योग्य त्या उपाययोजना करण्याची सूचना बैठकीत करण्यात आली.

> **"महानगरपालिकेचा कारभार करत असताना जनतेच्या पैशाचा योग्य वापर झाला पाहिजे आणि प्रत्येक विभागाने खर्चात बचत करणे काळाची गरज आहे. आमच्या बजेट बुकमध्ये जी कामे मंजूर आहेत, ती वेळेत आणि दर्जेदार झालीच पाहिजेत. जर एखादी फाईल किंवा काम विनाकारण थांबत असेल, तर त्यामागील ठोस कारण आम्हाला लेखी स्वरूपात हवे आहे. महापालिकेतील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एकमेकांच्या समन्वयाने काम करून पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासाला अधिक गतिशीलता द्यावी, हीच स्थायी समितीची मुख्य अपेक्षा आहे."**
>
> **-अभिषेक बारणे सभापती-स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महापालिका.**

स्थायी समितीकडून कोट्यवधींच्या कामांना मंजुरी!

पिंपरी | प्रतिनिधी

शहरातील विकासकामांना गती देण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीने विविध विकासकामांच्या प्रस्तावांना मंजुरी दिली. यामध्ये रस्त्यांचे डांबरीकरण, पदपथांची उभारणी, नाले आणि पावसाळी जलवाहिन्यांची दुरुस्ती, सार्वजनिक स्वच्छतागृहे, रुग्णालयांतील वैद्यकीय यंत्रांची देखभाल तसेच महापालिका इमारतींच्या दुरुस्तीच्या कामांचा समावेश आहे. विविध प्रभागांतील नागरी सुविधांशी संबंधित निविदांनाही समितीने मान्यता दिली.

चिंचवड येथील तालेरा रुग्णालयातील HVAC, ऑपरेशन थिएटर आणि विद्युत यंत्रणेचे पुढील दोन वर्षांसाठी चालन, देखभाल व दुरुस्ती करण्याच्या कामाला मंजुरी देण्यात आली. तसेच वायसीएम रुग्णालयातील एक्स-रे विभागातील डिजिटल रेडिओग्राफी सिस्टीम मशीनच्या देखभालीसाठी मूळ उत्पादक कंपनीसोबत करार करण्यास मान्यता देण्यात आली.

प्रभाग क्रमांक १६ मधील रावेत परिसरातील ताब्यात आलेले डी.पी. आणि नॉन डी.पी. रस्ते विकसित करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची QCBS पद्धतीने नियुक्ती करण्यात येणार आहे. प्रभाग क्रमांक २२ मधील पवनानगर आणि आदर्शनगर परिसरातील रस्त्यांचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करण्यासही मंजुरी मिळाली. प्रभाग क्रमांक १९ मधील सुदर्शननगर हेल्थ क्लबजवळील जुने सी.डी. वर्क पाडून नवीन बांधण्याच्या कामाचाही यात समावेश आहे.

प्रभाग क्रमांक १५ मधील आकुर्डी गावठाण परिसरात स्ट्रॉम वॉटर लाईन, पदपथ आणि इतर स्थापत्यविषयक कामे केली जाणार आहेत. याशिवाय धावडेवस्ती, गुळवेवस्ती, विविध सेक्टर, संत तुकारामनगर, कासारवाडी आणि एमआयडीसी परिसरातील रस्ते दुरुस्ती, डांबरीकरण, नाले आणि स्ट्रॉम वॉटर चेंबर्सच्या कामांना मंजुरी देण्यात आली.

सार्वजनिक सुविधांच्या दृष्टीने प्रभाग क्रमांक १५, दिघी-बोपखेल, चोविसावाडी, वडमुखवाडी, मोशी, डुडूळगाव आणि प्रभाग क्रमांक १८ मधील सार्वजनिक स्वच्छतागृहांच्या दुरुस्तीच्या निविदा मंजूर करण्यात आल्या. काही भागांत पेव्हिंग ब्लॉक बसविणे, दिशादर्शक फलक लावणे, पदपथ उभारणे आणि रोड फर्निचरची कामेही केली जाणार आहेत. प्रभाग क्रमांक १५ मधील महापालिका इमारतींची दुरुस्ती आणि फर्निचरच्या कामांनाही मान्यता देण्यात आली.

दरम्यान, 'ड' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विविध कार्यक्रमांसाठी ध्वनिक्षेपण, सीसीटीव्ही, जनरेटर आणि प्रकाश व्यवस्था करण्याच्या निविदेला मंजुरी देण्यात आली. 'ग' क्षेत्रीय कार्यालयाच्या पिंपरी आणि थेरगाव उपविभागातील कार्यक्रमांसाठीच्या निविदाही मंजूर करण्यात आल्या. दापोडी, निगडी आणि दिघी येथील पाच मुस्लिम व लिंगायत दफनभूमींच्या देखभालीसाठी नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत एका महिन्याची मुदतवाढ देण्यात आली.

प्रभाग क्रमांक १६, १७, १८ आणि २२ मधील रिक्षा-टेम्पो व्यवस्थेसाठी वाहन, इंधन आणि चालकासह पुढील आठ महिन्यांची मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. तसेच पुणे-नाशिक रस्त्यावरील कृषी उत्पन्न बाजार समिती ते सीएनजी पंपापर्यंतच्या रस्त्यावरील स्ट्रीट लाईट, डेकोरेटिव्ह पोल आणि हायमास्ट पोल कार्यान्वित करण्यासाठी महावितरणला आवश्यक शुल्क अदा करण्यास मान्यता देण्यात आली.

शिक्षण क्षेत्रात सांगवी येथील महापालिका औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी दृश्याधारित शिक्षण आणि व्हर्च्युअल प्रयोगशाळेची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या ई-लर्निंग मॉड्यूल खर्चाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले. महिला आयटीआय कासारवाडी येथे अतिवृष्टीमुळे आवश्यक साहित्य खरेदी करण्याच्या खर्चालाही मंजुरी देण्यात आली. राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत कार्यरत शहर अभियान व्यवस्थापक आणि समुदाय संघटकांच्या मानधनाला मुदतवाढ देण्यासही मान्यता देण्यात आली.

70 जणांचे प्राण वाचवणाऱ्या आर्याचा गौरव!

कुणाल मार्केट आग दुर्घटनेतील धाडसाची महापालिका सभेत दखल!

पिंपरी | प्रतिनिधी

चिंचवड येथील चाफेकर चौक परिसरातील कुणाल मार्केट इमारतीच्या पार्किंगमध्ये लागलेल्या भीषण आगीत प्रसंगावधान राखत सुमारे ७० नागरिकांचे प्राण वाचविणाऱ्या कु. आर्या विजय कांबळे (वय २०) हिचा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत विशेष सन्मान करण्यात आला.

कुणाल मार्केट इमारतीमध्ये सुमारे ४० दुकाने आणि ३८ सदनिका आहेत. पहाटे दीडच्या सुमारास इमारतीच्या पहिल्या मजल्यावर आग लागल्याचे लक्षात येताच आर्या हिने प्रसंगावधान राखून आरडाओरडा करत इमारतीतील नागरिकांना सावध केले. तसेच, नागरिकांना तातडीने टेरेसवर जाण्यास सांगितले आणि अग्निशमन विभागाला घटनेची माहिती दिली. काही मिनिटांत अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर टेरेसवर अडकलेल्या नागरिकांना शेजारील इमारतीत सुरक्षितपणे हलविण्यात आले. आर्याच्या धाडसामुळे आणि समयसूचकतेमुळे सुमारे ७० नागरिकांचे प्राण वाचविण्यात मदत झाली.

कु. आर्या कांबळे ही डी. वाय. पाटील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, आकुर्डी येथे डिझाइन विषयाच्या प्रथम वर्षात शिक्षण घेत आहे. स्वतःचा जीव धोक्यात असतानाही इतर नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत तिने दाखविलेल्या धैर्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

यावेळी उमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. कुलदीप जंगम, तसेच अन्य पदाधिकारी, नगरसदस्य व अधिकारी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

आर्या कांबळे हिने दाखविलेली धाडसी वृत्ती आणि सामाजिक बांधिलकी ही शहरातील नागरिकांसाठी प्रेरणादायी असून, तिच्या या कार्याचा महानगरपालिकेच्या वतीने गौरव करण्यात आला.

संकटात आर्या ठरली देवदूत!

कुणाल मार्केटमधील आगीच्या दुर्घटनेवेळी अनेकजण जीवाच्या भीतीने सैरावैरा धावत असताना २० वर्षीय आर्या कांबळे हिने प्रसंगावधान राखले. आरडाओरडा करून नागरिकांना जागे केले, टेरेसवर जाण्यास सांगितले आणि अग्निशमन दलाला माहिती दिली. तिच्या धाडसामुळे सुमारे ७० नागरिकांचे प्राण वाचविण्यात मदत झाली. संकटसमयी दाखविलेल्या या समयसूचकतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

माय-लेकाचा १८ व्या मजल्यावरून पडून मृत्यू!

पिंपरी | प्रतिनिधी

डांगे चौक येथील सिग्नेचर पार्क सोसायटीमध्ये १८ व्या मजल्यावरून पडून आई आणि सात वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना गुरुवारी (दि. ३०) सायंकाळी साडेसहाच्या सुमारास घडली. एकता मनोज भांगड आणि माधव मनोज भांगड अशी मृतांची नावे आहेत.

घटनेची माहिती मिळताच वाकड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. प्राथमिक पाहणीत दोघांचाही मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. मृत कुटुंब मूळचे राजस्थान येथील असून, महिलेचे पती हिंजवडीतील आयटी कंपनीत नोकरीला आहेत.

दरम्यान, ही घटना नेमकी कशामुळे घडली, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांनी फॉरेन्सिक पथकाला पाचारण केले असून, घटनास्थळाचा पंचनामा आणि पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

पिंपरी-चिंचवडच्या गीताची राष्ट्रीय स्तरावर झेप; सात बालवैज्ञानिकांमध्ये निवड!

पिंपरी | प्रतिनिधी

राष्ट्रीय स्तरावरील विज्ञान प्रदर्शनात आपल्या कल्पकतेची आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाची छाप पाडत पिंपरी-चिंचवड शहरातील बालवैज्ञानिक कु. गीता गणपत धनवडे हिने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. नवी दिल्ली येथे आयोजित 'इन्स्पायर मानक'च्या १२ व्या राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात देशातील सर्वोत्कृष्ट सात बालवैज्ञानिकांमध्ये तिची निवड झाली आहे. या यशामुळे तिला जर्मनी येथे जाण्याची सुवर्णसंधी मिळाली आहे.

माधव सदाशिव गोळवलकर

गुरुजी माध्यमिक विद्यालयात शिक्षण घेणाऱ्या गीताने १२ ते १४ ऑक्टोबरदरम्यान नवी दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात आपल्या प्रकल्पाचे प्रभावी सादरीकरण केले. देशभरातून सहभागी झालेल्या बालवैज्ञानिकांमध्ये तिने आपल्या प्रकल्पाच्या माध्यमातून वेगळी छाप पाडली. तिच्या कामगिरीच्या जोरावर देशातील सर्वोत्कृष्ट सात बालवैज्ञानिकांमध्ये तिची निवड करण्यात आली.

या निवडीमुळे गीताला जर्मनी येथे जाण्याची संधी मिळणार आहे. तिच्या या यशामुळे पिंपरी-चिंचवड शहराच्या शैक्षणिक आणि वैज्ञानिक क्षेत्रातील नावलौकिकात भर पडली आहे. लहान वयात विज्ञान क्षेत्रात मिळविलेल्या या यशाचे शहरातून कौतुक होत आहे.

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत उपमहापौर शर्मिला बाबर, नगरसेविका नम्रता लोंढे आणि नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांच्या हस्ते गीताचा सत्कार करण्यात आला. यावेळी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, अतिरिक्त आयुक्त डॉ. कुलदीप जंगम यांच्यासह अन्य पदाधिकारी, नगरसेवक आणि अधिकारी उपस्थित होते.

यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर यांनी गीताच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचे आणि मेहनतीचे कौतुक करून तिचे अभिनंदन केले. तसेच पुढील शैक्षणिक आणि वैज्ञानिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

दूषित पाण्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात!

दोन दिवसांत समस्या सोडविण्याचे अल्टिमेटम, अन्यथा जनआंदोलनाचा इशारा!

पिंपरी | प्रतिनिधी

मोशी प्राधिकरण आणि इंद्रायणीनगर परिसरातील प्रभाग क्रमांक ८ मध्ये दूषित, अनियमित आणि कमी दाबाने होणाऱ्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या गंभीर प्रश्नावर राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक तुषार सहाणे आणि नगरसेविका अश्विनी वाबळे यांनी आक्रमक भूमिका घेत महापालिका प्रशासनाला धारेवर धरले. दोन दिवसांत तांत्रिक पाहणी पूर्ण करून पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे निर्देश देण्यात आले असून, अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा नगरसेवकांनी दिला आहे.

या समस्यांबाबत महापालिकेत पाणीपुरवठा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत तातडीची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी शहर अभियंता मनोज सेठिया, कार्यकारी अभियंता भोसले, संबंधित कनिष्ठ अभियंता, कर्मचारी आणि माजी नगरसेवक संजय वाबळे उपस्थित होते.

बैठकीत राजवाडा परिसर, जय गणेश साम्राज्य, लांडगे नगर, गुरुविहार कॉलनी तसेच सेक्टर १, ४, ६ आणि ९ मधील पाणीपुरवठ्याच्या समस्यांवर चर्चा करण्यात आली. अनेक भागांत दुर्गंधीयुक्त आणि दूषित पाणी येत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. जलवाहिन्यांमधील गळतीमुळे सांडपाणी पिण्याच्या पाण्यात मिसळत असल्याची शक्यता व्यक्त करत संबंधित ठिकाणांची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात आली.

सेक्टर ४, ६ आणि ९ मध्ये पाणीपुरवठ्याचे निश्चित वेळापत्रक नसल्याने नागरिकांना मध्यरात्री किंवा भरदुपारी पाण्याची प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्याच्या वेळा निश्चित करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली.

सेक्टर १ आणि ४ मध्ये मुख्य जलवाहिनीजवळील भागात पुरेसे पाणी मिळते; मात्र जलवाहिनीच्या शेवटच्या टोकावरील नागरिकांना अपुरा पाणीपुरवठा होत आहे. सेक्टर ४ आणि ९ मधील कमी दाबाची समस्या सोडविण्यासाठी जलवाहिन्यांचे प्रेशर ऑडिट आणि हायड्रॉलिक बॅलन्सिंग करण्याची सूचनाही करण्यात आली.

प्रभागातील जुन्या जलवाहिन्यांचा तांत्रिक गोंधळ दूर करण्यासाठी संपूर्ण जलवाहिनीचे डिजिटल जीआयएस मॅपिंग करावे. तसेच आवश्यक ठिकाणी नवीन पाइपलाइन टाकण्यासाठी तांत्रिक प्रस्ताव तयार करावा, अशी मागणी नगरसेवकांनी केली.

नगरसेवक तुषार सहाणे यांनी पाणीपुरवठा विभागाकडे स्वतःच्या जलवाहिन्यांचे अद्ययावत रेकॉर्ड नसणे आणि कंत्राटदारांवर अवलंबून राहण्याच्या प्रकारावर नाराजी व्यक्त केली. केवळ तात्पुरती दुरुस्ती न करता दोन दिवसांत संपूर्ण तांत्रिक पाहणी पूर्ण करून नियमित दाबाने शुद्ध पाणीपुरवठा सुरू करावा. अन्यथा नागरिकांना सोबत घेऊन जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

नगरसेविका अश्विनी वाबळे यांनीही दूषित पाणी आणि अनियमित वेळेमुळे गृहिणी, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांचे हाल होत असल्याचे सांगितले. नागरिक नियमित पाणीपट्टी भरत असतानाही त्यांना शुद्ध आणि पुरेसे पाणी मिळत नसेल, तर ही गंभीर बाब आहे. अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून गळती रोखावी आणि शेवटच्या टोकापर्यंत समान दाबाने पाणी पोहोचवावे, अशी मागणी त्यांनी केली.

दरम्यान, शहर अभियंता मनोज सेठिया यांनी समस्यांची दखल घेत संबंधित तांत्रिक पथकाला प्रभागात प्रत्यक्ष पाहणी करून पाणीपुरवठ्याचे नियोजन सुरळीत करण्याचे निर्देश दिले. आता दोन दिवसांच्या मुदतीत प्रशासनाकडून काय उपाययोजना केल्या जातात आणि नागरिकांना दूषित व अनियमित पाणीपुरवठ्यातून कधी दिलासा मिळतो, याकडे लक्ष लागले आहे.

दोन दिवसांत ३० हून अधिक सोसायट्यांत वस्तू संकलन मोहीम!

पिंपरी | प्रतिनिधी

दिवाळीनिमित्त घरांची साफसफाई करताना वापरात नसलेल्या; मात्र सुस्थितीत असलेल्या वस्तू फेकून देण्याऐवजी त्या गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन पिंपरी-चिंचवड महापालिकेने केले आहे. यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभाग आणि स्वच्छ संस्थेच्या संयुक्त विद्यमाने ३१ ऑक्टोबर आणि १ नोव्हेंबर २०२६ रोजी शहरातील विविध गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये 'आर.आर.आर. (रिड्यूस, रीयूज, रिसायकल) कलेक्शन ड्राइव्ह' राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेअंतर्गत दोन्ही दिवशी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत वस्तूंचे संकलन केले जाणार आहे. दिवाळीच्या साफसफाईत अनेक घरांमधून कपडे, पुस्तके, शैक्षणिक साहित्य, खेळणी, भांडी, चादरी, पडदे, फर्निचर आणि वापरण्यायोग्य इलेक्ट्रॉनिक वस्तू बाजूला काढल्या जातात. या वस्तू कचऱ्यात न टाकता त्यांचा पुनर्वापर व्हावा आणि गरजू नागरिकांना त्यांचा लाभ मिळावा, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले की, कचऱ्याचे प्रमाण कमी करण्यासाठी वस्तूंचा पुनर्वापर आणि संसाधनांचा सुयोग्य वापर महत्त्वाचा आहे. वापरण्यायोग्य वस्तू कचऱ्यात टाकण्याऐवजी त्यांचा पुनर्वापर केल्यास पर्यावरणावरील ताण कमी होण्यास मदत होते. त्यामुळे नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा.

उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनीही नागरिकांना घरातील सुस्थितीत असलेल्या पुनर्वापरयोग्य वस्तू आर.आर.आर. केंद्रांमध्ये जमा करण्याचे आवाहन केले आहे. वस्तूंचा अपव्यय टाळणे, कचऱ्याचे प्रमाण कमी करणे आणि पर्यावरण संवर्धन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

रेनबो व्हिस्टा, आहेरनगर; सिद्धिविनायक विंड चाइम, रहाटणी; द वुड्स, वाकड; अक्षर एलिमेंटा व पॅलॅडिओ अपार्टमेंट, ताथवडे; द्वारका सनक्रेस्ट फेज १ व यश संकुल, पिंपळे सौदागर; ओमेगा पॅराडाइज, होरायझन्स ॲट वाकड व ला मेलोसा, वाकड; भूमी ओराबेल, सेलेस्टियल सोसायटी फेज २, राजलक्ष्मी ग्रीन्स सोसायटी, उदय हिलटॉप रेसिडेन्सी, संत ज्ञानेश्वर उद्यान व चंद्रभागा कॉर्नर, रावेत; तसेच रेणुका पंचतत्त्व, ताथवडे येथे वस्तू संकलन होणार आहे.

१ नोव्हेंबर रोजी संकलनाची ठिकाणे

वुडसव्हिल फेज १, २ व ३, लोटस नंदवन फेज १, कुमार प्रिन्सव्हिल फेज १ आणि सेंट्रल पार्क रेसिडेन्सी, मोशी; रिव्हर रेसिडेन्सी फेज ३, चिखली; ऐश्वर्यम, आकुर्डी; गोखले वृंदावन, चिंचवड; ट्युलिप इन्फिनिटी वर्ल्ड, पुनावळे; मिलेनियम पॅसिफिक; वसंत ॲव्हेन्यू, ताथवडे; निसर्ग किरण, रहाटणी; गंगा स्काइज सोसायटी; वल्लभनगर, पिंपरी आणि कुमार प्रथम, मोशी येथे वस्तू संकलन केले जाणार आहे.

या मोहिमेसंदर्भात अधिक माहिती किंवा मदतीसाठी नागरिकांनी ७०३०९०१९९३ किंवा ९१६८६८४६७० या क्रमांकांवर संपर्क साधावा. दिवाळीचा आनंद गरजूंसोबत वाटून घेत पर्यावरणपूरक शहर घडविण्यासाठी नागरिकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.